महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७३ वा | दिनांक : २७/०८/२०२५ | वार : बुधवार

## मराठा आरक्षणाच्या वादात शिंदे गट सावध



**मुंबई** : मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा तापला असून, मनोज जरांगे २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसणार आहेत. हायकोर्टाने त्यांना मुंबई येण्यापासून मनाई केली असली, तरी ते आपल्या आंदोलनावर ठाम आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर शिंदे गटाने मात्र सावध भूमिका घेत मौन बाळगल्याचे दिसून येत आहे. त्यातच मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबद्दल माध्यमांसमोर कोणतेही विधान न करू नका, अशी सक्त ताकीद उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांना दिल्याची माहिती समोर येत आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली असून, त्यांचा रोख मुख्यत्वे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आहे. "एकनाथ शिंदे हे मराठ्यांना आरक्षण द्यायला तयार होते, पण फडणवीस यांनीच यात अडथळे आणले," असा आरोप जरांगे यांनी केला आहे. फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठा समाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

मनोज जरांगे सातत्याने फडणवीसांवर टीका करत असताना, एकनाथ शिंदे मात्र मौन राखताना दिसत आहेत. मंत्रिमंडळ बैठकीनंतर शिवसेनेच्या मंत्र्यांच्या घेतलेल्या गुप्त बैठकीत त्यांनी आपल्या मंत्र्यांनाही माध्यमांसमोर प्रतिक्रिया देऊ नका, अशा सूचना दिल्या आहेत. यासोबतच बोलताना महायुती बाबत समन्वय साधून बोलणे अपेक्षित आहे, अशी चर्चा झाल्याचे समजते. तसेच गणेशोत्सव काळामध्ये जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचा, गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक या व्याख्येनुसार पक्षवाढीसाठी प्रयत्न करा, असे निर्देश एकनाथ शिंदेंनी त्यांच्या मंत्र्यांना दिलेत.

दरम्यान, मनोज जरांगे हे देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट टीका करत असताना, भाजप नेत्यांनी त्यांच्यावर टीकेचा भडीमार सुरू केला असून, प्रत्युत्तर दिले जात आहे. त्याचवेळी दुसरीकडे, शिंदे गटाचे मंत्री शंभुराज देसाई मात्र जरांगे यांच्या बचावासाठी पुढे आले आहेत. त्यांनी म्हटले की, "मराठवाड्याची बोलण्याची शैली तशीच आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी वापरलेला चुकीचा शब्द मागे घेतला." तसेच आपण मराठा समन्वय समितीचा सदस्य आहे. त्यामुळे राज्य सरकार आणि मनोज जरांगे यांच्यामध्ये मध्यस्ती करण्याची जबाबदारी जर आपल्याला दिली तर ती पार पाडू असा विश्वासही शंभुराज देसाई यांनी व्यक्त केला.

## जयंत पाटील झुकत नाही, तर थेट पालथाच पडतो



**सांगली** : भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यात चांगलीच खडाजंगी रंगली आहे. पडळकर यांनी जयंत पाटील हे झुकत नाहीत, तर थेट पालथेच पडतात अशी टीका केल्यानंतर जयंत पाटील यांनीही त्यांना जशास तसे प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी पडळकरांचा उल्लेख हिस्ट्रीशीटर असा करत अशा लोकांमुळे सभागृहात बसणेही अवघड झाल्याचा संताप व्यक्त केला आहे.

जयंत पाटील यांनी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्षपद सोडताना आपण यापुढेही शरद पवारांसोबतच राहणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर त्यांनी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्यापुढेच सांगली जिल्हा अन् वाळवा तालुका सहजासहजी कुणापुढे झुकत नसल्याचाही दावा केला होता. गोपीचंद पडळकर यांनी त्यांच्या या विधानाचा दाखला देत त्यांच्यावर शरसंधान साधले होते. जयंत पाटलांची मानसिकता मला खचल्यासारखी दिसत आहे. ते म्हणतात तसे सांगली जिल्हा, वाळवा तालुका कधी झुकत नाही. ते बरोबर आहे. पण जयंत पाटील हा झुकत नाही, तर थेट पालथाच पडतोय, असे ते म्हणाले होते.

जयंत पाटील यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त आयोजित व्याख्यान व पुरस्कार सोहळ्यात बोलताना त्यांच्या टीकेला जशास तसे प्रत्युत्तर दिले. यावेळी त्यांनी पडळकरांचा उल्लेख हिस्ट्रीशीटर असा केला. ते म्हणाले, सध्या बऱ्याच चोऱ्या-माऱ्या ऐकू येत आहेत. येत होत्या. पण आता मत चोरीचा प्रकारही ऐकण्यास येत आहे. आता या सरकारकडून एखादी अपेक्षा करणेही अवघड झाले आहे. राज्याच्या विधानसभेत हिस्ट्रीशीटर (रेकॉर्डवरील गुन्हेगार) बसल्याचे दिसत आहेत. यामुळे सभागृहात विचार मांडणेही अवघड झाले आहे.

ते पुढे म्हणाले, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतचोरीविषयी केलेला आरोप खरा ठरत आहे. जनता हे उघड्या डोळ्यांनी अनुभवत आहे. मतदानात गडबड झाल्याची बाब स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मान्य करत आहेत. राज्यभर लोकप्रिय असणारा व्यक्ती स्वतःच्या गावात निवडून येत नाही आणि ज्याला गावात कुणी विचारत नाही, तो मात्र सर्वाधिक मतांनी निवडून येतो. हे नवलच आहे. हे सरकार देशात एक नवा कायदा आणत आहे. त्यात एखादा नेता 30 दिवस तुरुंगात असेल तर त्याचे मंत्रिपद रद्द काढण्याची तरतूद आहे. या माध्यमातून विरोधी पक्षांच्या मुख्यमंत्र्यांना आत टाकण्याचा व राज्य सरकार पाडण्याचा डाव आहे.

त्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला जी घटना दिली, तिची राखण करणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. लोकशाही अण्णाभाऊ साठे यांनी संघर्ष शब्दबद्ध केला. तोच संघर्ष आता आपल्याला करावा लागेल, असेही जयंत पाटील यावेळी बोलताना म्हणाले.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची १७ सप्टेंबरपासून सुरुवात

**पुणे** : ग्रामविकासाची भूमिका जनसामान्यांपर्यंत पोहोचली पाहिजे, ग्राम विकासाला बळ देणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे या उद्देशाने सर्वांना बरोबर घेऊन 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' तयार करण्यात आले आहे. लोकसहभाग हा अभियानाचा मुख्य गाभा असून त्या माध्यमातून अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करावे, असे आवाहन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे उपमहासंचालक तथा यशदाअंतर्गत राज्य ग्रामीण विकास संस्थेचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, यशदाचे प्रवीण प्रशिक्षक लक्ष्मीकांत शिंदे, पंचायत राज संचालक गिरीश भालेराव आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची येत्या 17 सप्टेंबर रोजी सुरुवात करण्यात येणार आहे, असे सांगून गोरे म्हणाले, ग्रामविकास विभागाकडे मोठी यंत्रणा असून विभागाने ठरविल्यास हे अभियान घराघरात पोहोचेल. सरपंच, अधिकाऱ्यांनी हे अभियान आपले आहे या भूमिकेतून काम करावे लागेल.समृद्ध गाव बनविण्याचा संकल्प मुख्यमंत्री यांचा असून त्यासाठी हे अभियान तयार करण्यात आले आहे. हे अभियान 100 दिवसात राबविण्यात येणार असून प्रत्येक तालुक्यात 20 गावे निवडण्यात येणार आहे. सात ते साडेसात हजार गावे या अभियानात सहभागी होणार असून यातील 1 हजार 920 गावांना काही ना काही बक्षीस देण्यात येईल. चांगले काम करणारी जिल्हा परिषद, तालुका पंचायत समिती, ग्रामपंचायत यांना बक्षीस देण्यात येणार आहे. समृद्ध महाराष्ट्रासाठी सक्षम पंचायत ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत.अभियानात ग्रामपंचायत सक्षमीकरणासाठी आवश्यक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. ग्रामीण भागासाठी असलेल्या विविध योजनांची शंभर टक्के अंमलबजावणी करावी यासाठी या अभियानात स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. 100 टक्के घरकुलांचा लाभ देणारे गाव, 100 टक्के आयुष्मान भारत कार्ड देणारे गाव, स्मशानभूमी आदी कामे करणाऱ्या गावांना पुरस्कार देण्यात येईल, असेही ते म्हणाले.

पोपटराव पवार यांनी राज्यात ग्रामविकासांच्या अनुषंगाने गेल्या काही वर्षात झालेले बदल, राबविण्यात आलेल्या योजनांचा आढावा घेतला. ते म्हणाले, एका गावातील सरपंच, ग्रामसेवकाने ठरवले तर विकास सेवेची मोठी यंत्रणा त्यांच्यामागे उभी राहून गावात मोठे काम करण्याची संधी मिळते. लोकसहभागातून, श्रमदानातून गावात चांगले काम उभे राहू शकते हे हिवरे बाजार गावाने दाखवून दिले आहे. हिवरे बाजारची सुधारणा पाहण्यासाठी देशाच्या विविध भागातून शिष्टमंडळे भेट द्यायला येत असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ ऑगस्ट २०२५

# दौलताबाद येथे शांतता समितीची बैठक संपन्न



**दौलताबाद (जावेद अहमद)** : गणेश उत्सव व ईद ए मिलाद निमित्ताने जातीय सलोखा राखावा उपायुक्त पंकज अतुलकरदौलताबाद पोलिस स्टेशन च्या वतीने गणेश उत्सव व ईद ए मिलाद निमित्ताने जातीय सलोखा बैठक या अनुषंगाने राधाकृष्ण मुकुंद मंदिर येथे मंगळवारी शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली.यावेळी पंकज अतुलकर पोलिस उप आयुक्त परिमंडळ १ यांनी सांगितले विना परवानगी मिरवणूक काढू नका , गणपती मुर्ती सुरक्षा कमिटीने करावीडि,जे वापरू नका ,गुलाल वापरु नका फुल वापरा अवैध धंदे बंद करण्यासाठी पथक नेमावे, रात्रीची गस्त, सोशल मीडियावर वॉच आदी विषयांवर पदाधिकाऱ्यांनी शांतता कमिटीच्या बैठकमध्ये सूचना सूचवल्या. या काळामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी दक्ष राहण्याच्या सूचना दिली यावेळी उपायुक्त पंकज अतुलकरसंजय सानप सहा.पोलिस आयुक्त छावनी विभागपोलिस निरिक्षक रेखा लोढे , उपनिरिक्षक सुनिल बोडखे ,वसंत शेळके,आयुब पठान, काँग्रेस तालुका अध्यक्ष सर्जेराव चव्हाण,माजी सरपंच संजय काजुने, हारुन सय्यद, जनार्दन गवळी, उपसरपंच सय्यद मतिन, ज्ञानेश्वर पवार, मनेश गाजरे,विजय जाधव, सय्यद शेरु विश्वनाथ ढगारे, मंगेश जाधव,गणेश शेलार, प्रविन बर्डे,संदिप शेळके दिपक घुसळे, नाना मालकर, बबन साठे, सोमनाथ नवले,देविदास गवंदे, पोलिस पाटील व गणेश मंडळ पद अधिकारी,ग्रामस्थ यांची प्रमुख उपस्थिती होते

# पाठ्यपुस्तक निर्मितीवर सुधीर कांबळे यांची नियुक्ती



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : स्मृतीशेष भीमराव नाईक माध्यमिक आश्रमशाळा होळी येथील विज्ञान शिक्षक ,प्रसिद्ध व्याख्याते,बौद्ध साहित्याचे अभ्यासक सुधीर कांबळे यांची महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती अभ्यासक्रम संशोधन मंडळाचे शास्त्र विषय समितीचे सदस्य म्हणून नुकतीच निवड करण्यात आली आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 वर आधारित येऊ घातलेल्या नवीन अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक विषयक पाठ्यपुस्तके आणि पूरक साहित्य निर्मितीसाठी बालभारतीने समित्यांची पुनर्रचना केली असून शास्त्र विषयाच्या विषय समितीवर सुधीर कांबळे यांची निवड केली आहे.वास्तविक ही निवड लेखी परीक्षा ,तोंडी परीक्षा आणि मुलाखतीच्या आधारे झाली आहे.यापूर्वीही सुधीर कांबळे हे अभ्यासक्रम मंडळात शास्त्र विषय समिती सदस्य म्हणून अर्थातच कार्यरत होते.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळात आणि यशदा येथेही कार्यरत आहेत.उमरगा पंचक्रोशीत ते एक बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून प्रसिद्ध आहेत.व्यासंगी बैठक,तत्वज्ञानाचे विहंगमावलोकन करण्यात त्यांचे अष्टपैलूत्व त्यांनी नेहमीच आपल्या व्याख्यानातून आणि लेखणीतून सिद्ध केले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# मनात आलेले विचार व्यक्त करणे म्हणजे साहित्य सेवा- साहित्यिक धोंडीरामसिंह राजपूत



**कन्नड (अरुण थोरात)** : विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी मनात आलेले विचार लेखनात, मनोगतात व्यक्त होणे म्हणजेच साहित्य.आणि हे गुण विद्यार्थी दशेतून च अंगी बाळगण्यासाठी कवी संमेलने होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सेवानिवृत्त गट शिक्षणाशिकारी धोंडीराम सिंह राजपूत यांनी भराडी येथे कवी संमेलनात व्यक्त केले.पुढे बोलतांना ते म्हणाले की,जर जीवनात यशस्वी होऊन तुम्हाला आपले भाग्य बदलायचे आणि प्रगती करायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव व शिक्षण महर्षी कै.हिम्मतराव भाऊसाहेब गरुड यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित ' फकिरा ग्रामीण कविसंमेलन ' प्रसंगी श्रीमान अशोकदादा गरुड शैक्षणिक व सामाजिक समूह सिल्लोड संचलित भराडी येथील ज्ञानविकास प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य रा. ना. दौड अध्यक्ष म्हणून बोलत असताणा म्हणाले की, आपण रसिक व्हावे, त्यातून नवोदित कवी निर्माण होऊ शकतात. जीवनात लेखकाला आत्मसात करावे त्यामध्ये साहित्य कला महत्वाची. समाजाला आनंद तर साहित्यिकाला आत्मानंद देते. प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटक धोंडीरामसिंह राजपूत तसेच अध्यक्षस्थानी असलेले रा.णा. दौड यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.या कविसंमेलनात ग्रामीण भागासह शहरी भागातील कवी,नवोदित कवी, चिमुकले विद्यार्थी कवी यांनीही सहभाग नोंदवत कार्यक्रमात उत्साह निर्माण केला.स्वागतोत्सुक अशोकदादा गरूड म्हणाले की धन संपत्ती असेल नसेल परंतु सरस्वती प्रसन्न, प्राप्त असेल तर समाजात किंमत असते. म्हणून लिखाण कला, विचार व्यक्त करत वकृत्व असावे असे मत व्यक्त करत उपस्थिताचे आभार मानले. याप्रसंगी अशोकदादा गरुड यांच्यासह साहित्यिक वंदना पाटील, सुप्रसिद्ध गझलकार रा.ना.दौड, धोंडीरामसिंह राजपूत/ठाकूर, निसर्गकवी धनंजय गव्हाले, सोमीनाथ सोनवणे, शंकर बावणे, पंडित वराडे, सुभाष काकडे, गजानन गायकवाड, विक्रम दौड, नानासाहेब गायकवाड, दादाराव जाधव, दत्ता मोरस्कर, दौलत भारती,देविदास तुपे,विनायक सुस्ते, अमोल भिलंगे, दामोधर मोरे, लक्ष्मण वाल्डे, श्रीराम दापके, प्रतिभा आघार्डे, राजेंद्र सपकाळ, बद्रिनाथ भालगडे, साईनाथ फुसे, राजू आठवले, डॉ.गजेंद्र आवारे,प्रवीण दाभाडे, नारायण खेडकर, गायकवाड, गीतांजली गजबे,काशिनाथ शेजुळ, शिवाजी गरुड, दीपक बिडवे, योगेश रासने,विद्यार्थी कवी रोहिणी खांदवे, जयश्री शेळके, अथर्व मुळे, सिद्धी मुरमे, वैष्णवी साळवे, अनन्या पाटील, ज्ञानविकास विद्यालयाचे मुख्याध्यापक,सहशिक्षकवृंद, शालेय वाहनचालक मालक यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ ऑगस्ट २०२५


## नेत्याचे नव्हे पक्षाचे कार्यकर्ते म्हणून काम करा- भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते




**कन्नड (अरुण थोरात) :** भाजप मध्ये पद ही जबाबदारी आहे. जो एकनिष्ठ पणे काम करतो. पक्ष त्यांची दखल घेतोच. कार्यकर्त्यांनी नेत्याचे नव्हे तर पक्षाचे कार्यकर्ते म्हणून काम करावे असे अवाहन भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी केले आहे.ते दि. 26 ऑगस्ट रोजी चापानेर ता.कन्नड येथे आयोजित सत्कार समारंभ व बैठक प्रसंगी बोलत होते.भाजप पश्चिम मंडळ मधिल नवनियुक्त पदाधिकारी सत्कार व आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, राज्य कार्यकारणी सदस्य डॉ. संजय गव्हाणे, मा.जि.फ. सदस्य किशोर आबा पवार, जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, आदींनी मार्गदर्शन केले.कार्यकर्त्यांच्या सहकार्य व मेहनती शिवाय पक्षाचे काम पुढे जाणार नाही. जो जबाबदारी पार पाडतो. तो नेता बनतो. आपली विचारधारा तळागाळा पर्यंत पोहचविणे ही आपली जबाबदारी आहे. आपण प्रत्येक गावांत कामे केली आहेत. त्यामुळे जनतेत आपला विश्वास आणि सन्मान वाढला आहे. लोकसभा, विधानसभा या नेत्यांच्या निवडणुका असतात. स्थानिक स्वराज्य संस्था या कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे आपण झटून कामाला लागावे. भाजप देशात राज्यात आणि तालुक्यात ही नंबर एक चा पक्ष आहे. आगामी जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती भाजपचाच होण्यासाठी कुठलीही कसला ठेवणार नाही. असे मार्गदर्शन श्री खंबायते यांनी यावेळी केले.दरम्यान पक्षातील नवनियुक्त पदाधिकार्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री खंबायते, डॉ. संजय गव्हाणे यांचे सह जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, मा.जि.प.सदस्य किशोर आबा पवार, जिल्हा उपाध्यक्ष रामा मुळे, सचिव- अनिल चव्हाण, रा.प.सदस्य रमेश जाधव, भटके विमुक्त जिल्हाध्यक्ष अजबसिंग राजपूत, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष प्रशांत आग्रवाल, सो.मि. प्रमुख सौरभ कुलकर्णी, मा. किसान मोर्चा अध्यक्ष प्रकाश घुले, मंडळ अध्यक्ष ललित सुरासे, सुनिल निकम, कैलास जाधव, अरुण थोरात, सुदाम पवार आदी उपस्थित होते.

## क्रिकेट स्पर्धेत फातिमा कॉन्व्हेन्ट हायस्कूल, अली अलाना हायस्कूल, सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय यांचे वर्चस्व



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय कन्नड व तालुका क्रीडा समिती कन्नड यांच्या विद्यमानाने तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धा यश क्लब कन्नड येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी स्पर्धेचे उद्घाटन कन्नड पोलिस स्टेशन चे सहायक पोलीस निरीक्षक श्री.कुणाल सूर्यवंशी व गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी कन्नड क्रीडा संकुल समितीचे सदस्य व क्रीडा मार्गदर्शक प्रवीण शिंदे, तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोसावी, योगेश पाटील राज्यस्तरीय कुस्ती पंच विजयसिंग बारवाल, राकेश निकम,अजित खांबट, शमाबी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वसीम शेख, डी, एस,जाधव, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशाल दांडेकर, एजाज शहा, कडुबा चव्हाण, प्रशांत नवले, रविकुमार सोनकांबळे यांनी काम पाहिले, तसेच पंच म्हणुन योगेश पाटील, मुन्ना शेख यांनी काम पाहिले. क्रिकेट सामनाचे अंतिम निकाल पुढीलप्रमाणे 14 वर्षे मुले प्रथम क्रमांक : फातिमा कॉन्व्हेन्ट हायस्कूल कन्नड द्वितीय क्रमांक: कृष्णा इंटरनॅशनल स्कूल कन्नड17 वर्षे मुले प्रथम क्रमांक: अली अलाना स्कूल कुंजखेडाद्वितीय क्रमांक: महात्मा फुले हायस्कूल पिशोर 19 वर्षे मुले अली अलाना हायस्कूल कुंजखेडा 17 वर्षे मुली सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय कन्नड

## समाजशास्त्र पदव्युत्तर विषयात विद्यापीठात प्रथम आलेला नागराज पालापूरे यांचा बापूराव पाटील यांच्या हस्ते सत्कार




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील समाजशास्त्र पदव्युत्तर विषयात मार्च-एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत गुणानुक्रमे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल नगर शिक्षण विकास मंडळाच्या वतीने जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते नागराज पालापूरे यांचा मंगळवार (ता. २६) रोजी सांस्कृतिक सभागृहात सत्कार करण्यात आला. या महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा गेल्या अनेक वर्षापासून जोपासलेली असून पुढेही ही गुणवत्ता कायम राखण्याचा मनोधर्य यावेळी बापूराव पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, संस्थेचे संचालक राजेंद्र भोसगे, डॉ. सतिश शेळके, सुजित शेळके, चंद्रकांत बालकुंदे, गणेश अंबर, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, बेळंब चे सरपंच महालिंगप्पा बाबशेट्टी, पालक सुभाष पालापूरे, रोहित पालापूरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सतिश शेळके यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अशोक सपाटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक-प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ ऑगस्ट २०२५

## शरण पाटील फाऊंडेशन व महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमाने शेत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन शरण बसवराज पाटील यांच्या हस्ते



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : शरण पाटील फाऊंडेशन व महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी हिप्परगा रवा, शिवकर वाडी, लोहारा खु. व खेड येथील शेत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपाचे युवा नेते शरण बसवराज पाटील व उपविभागीय अधिकारी दत्तात्रय शेवाळे यांच्या हस्ते करण्यात आले.शेतकरी बांधवांची मागणी लक्षात घेऊन शेतीमाल बाजारात लवकर दाखल व्हावा यासाठी शेतापर्यंत रस्ते असणे गरजेचे आहे. शेतरस्ते, शिवरस्ते व पाणंद रस्ते मजबूतीकरण करण्याचा निर्णय घेऊन, शेतकरी हित जपण्याचा उद्देशाने, उमरगा व लोहारा तालुक्यातील शेतरस्ते महाराष्ट्रात आदर्श पॅटर्न करण्याचा संकल्प करुन ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांच्या लोकवाट्याची सर्वस्वी जबाबदारी शरण पाटील फाऊंडेशनने स्वीकारली आहे. संकल्पाचे सिध्दीत रुपांतर करण्यासाठी लोहारा तालुक्यातील हिप्परगा रवा, शिवकर वाडी, लोहारा खु. व खेड येथील शेतरस्ते कामाचे भारतीय जनता पक्षाचे युवा नेते तथा उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील व उपविभागीय अधिकारी दत्तात्रय शेवाळे यांच्या हस्ते मंगळवारी (दि.२६) भूमिपूजन करण्यात आले. यावेळी तहसीलदार रणजितसिंह कोळेकर, जिपचे उप विभागीय अभियंता दिलीप बिराजदार, भाजपाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, योगेश राठोड, बाजार समितीचे सभापती प्रशांत काळे, नितीन पाटील, हरी लोखंडे, बाबा सुर्यवंशी, विजय लोमटे, हिप्परगा (रवा) सरपंच अभिमान कांबळे, खेडचे सरपंच राजश्री कांबळे, महेश माशाळकर, ब्रम्हानंद पाटील, बालाजी वडजे, व्यंकट रसाळ, लोहारा (खु.) चे सरपंच सचिन रसाळ, वि. पांढरीचे सरपंच मारुती कार्ले, विनोद मोरे, आप्पा होनाळकर, सुनिल जाधव, सिध्देश्वर गव्हाळे, व्यंकट पाटील आदीसह हिप्परगा रवा, शिवकर वाडी, लोहारा खु. व खेड येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बालगृहात विविध उपक्रमांनी दिला आपुलकीचा संदेश

**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. (सौ )इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे शासकीय बालगृह/ निरीक्षण गृह, छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांना रक्षाबंधना निमित्ताने राख्या बांधून मोठ्या उत्साहात साजरा केला. हा उपक्रम समाजशास्त्र विभागातर्फे मागील २० वर्षापासून सातत्याने राबविण्यात येत आहे या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी विद्यार्थिनींना व विभागाला या शैक्षणिक भेटीसाठी शुभेच्छा दिल्या. या शैक्षणिक भेटीदरम्यान निरीक्षणगृहाचे अधिक्षक श्री सूर्यभान जंगले यांनी विद्यार्थिनींना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देऊन बालगृहातील विद्यार्थ्यांना राख्या बांधण्याची अनुमती /परवानगी दिली. याप्रसंगी समाजशास्त्र विभागातील प्राध्यापिका डॉ. आरती धनवे यांनी प्रास्ताविक पर मनोगत व्यक्त केले. निरीक्षणगृहाचे शेख सर यांनी विद्यार्थिनींना निरीक्षण गृहाविषयी माहिती देऊन रक्षाबंधन सणाचे महत्त्व सांगितले याप्रसंगी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. धनश्री पिंपळे हिने पौराणिक कथेच्या माध्यमातून रक्षाबंधन सणाविषयी चे महत्व सांगितले बालगृहातील विद्यार्थिनी देखील देशभक्तीपर अच्युतम केशवम गीत सादर करून स्वतःमधील कलाप्रकार सादर केले. बाल निरीक्षण गृहामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे दहावी वर्गामध्ये 98 गुण प्राप्त केल्या असल्यामुळे समाजशास्त्र विभागाने विद्यार्थ्यांचा सत्कार केला. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी राख्या बांधून त्यांना गोडधोड खाऊ घातले व निरीक्षण गृहातील विद्यार्थ्यांशी आपुलकीने संवाद साधून त्यांचा निरोप घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीए प्रथम वर्षाचे विद्यार्थिनी अंजली खिराडे यांनी केले व आभार प्रतीक्षा लिंबारे हिने मानले. या भेटीचे नियोजन समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. आरती धनवे, प्रा. डॉ. वैशाली पाटील, प्रा. सुजाता कणके आदींनी केले. याच शैक्षणिक भेटीचे औचित्य साधून समाजशास्त्र विभागाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी साठी राखी मेकिंग कॉम्पिटिशन आयोजित केले होते, या स्पर्धेचे परीक्षण महाविद्यालयातील संस्कृत विभागप्रमुख प्रा. डॉ. अन्विता अग्रवाल यांनी केले. स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. साक्षी बागडे, द्वितीय क्रमांक कु. कोमल बागडे तृतीय क्रमांक कु. सायली केळकर व कु. अंजली खिराडे यांनी पारितोषिक मिळविले स्पर्धेतील विजेत्यांचे प्राचार्यांनी व परीक्षकांनी अभिनंदन केले.




## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान




**जालना** : 2023 ते 24 यादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची कला शाखेची पदवी संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना एका समारंभात प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांच्या हस्ते किशोर खरात, प्रथमेश जैस्वाल, साक्षी देशमुख, दिनेश काळे, भारती बावणे, अनिता वाघमारे, मयुरी गिरी, प्रसाद वाघमारे या काही प्रातिनिधिक विद्यार्थ्यांना यावेळी पदवी प्रमाणपत्र देण्यात आले. महाविद्यालयातील शिक्षकांनी अभ्यासक्रमाबरोबर जीवनविषयक कौशल्यही आम्हाला शिकवली ज्याच्या आधारावर आम्ही भविष्यातील वाटचाल करणार आहोत अशी प्रतिक्रिया पायल धनगर या विद्यार्थिनीने दिली.डॉ. कविता प्राशर म्हणाल्या, पदवी मिळाली म्हणजे शिक्षण संपले असे नाही तर यानंतर खऱ्या अर्थाने आपल्या जीवनाची सुरूवात होणार आहे. ज्ञान संपादन करणे ही एक अविरत चालणारी प्रक्रिया असून जीवनात यशस्वी होण्यासाठी संपादन केलेले ज्ञान आचरणात आणण्याची गरज आहे. या बळावर स्वतःसह आपल्या कुटुंबाचे, महाविद्यालयाचे व देशाचे नाव मोठे करावे असेही त्या म्हणाल्या.यावेळी कला शाखेतील डॉ. कालिदास सूर्यवंशी, डॉ. उद्धव थोरवे, डॉ. बळीराम कटारे, डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा.संभाजी कांबळे, प्रा.विलास भुतेकर, डॉ. रवींद्र भोरे, प्रा. राजक्रांती वलसे, डॉ. व्यंकट कोरेबोईनवाड यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ ऑगस्ट २०२५

## "उलट्या कडीच घर" ही कामगाराची दानत उजळ माथ्यानं मिरवणारी आणि मुजोर व्यवस्थेच्या डोळ्यांत अंजन घालणारी कविता - प्रा . शिवाजी जोगदंड

मित्रवर्य सुनील उबाळे यांचा 'उलटाकडीचे घर ' हा दुसरा कवितासंग्रह नुकताच वाचनात आला .हा संग्रह वाचताना कुठलाही संवेदनशील माणसांच्या डोळ्यांत टचकन पाणी आल्याशिवाय रहात नाही. कष्ठकरी ,सामान्य माणसांच्या वास्तव जगण्यातली दाहकतेचे चटके वाचकाचा काळजाची चिरफाड करीत . कामगाराविषयची आपार करूणा जिवंत करीत . कामगाराप्रती आपार सहानुभुतीचे तट उभे करण्यात कवी यशस्वी झाला . कामगाराच्या जगण्याची कुठलीच दिशा नाही . आस्थाव्यस्थ कचऱ्याच्या ढिगाऱ्यासारखी पडलेली मुक्या बहिऱ्या माणसांचा वेदनेला वाचा फोडणारी सरळसोट आणि गंभीर स्वरूपाचा कुठलेही आढेवेडे न घेता जगण्याचं चिंतन मांडणारी कविता . घराची कडी बसवतानां सुताराकडून उलटी बसली .तेव्हा सुतार उदया ति सोयिशा बसवून देतो .असं हसत हसत म्हणाला यातली कवीची आजी अंसाचे बोल मात्र माणुस म्हणून आपल्याला आतुन बाहेरून पार हादरून टाकतात . " आमचे दिवस तरी कुठे सरळ आहेत .भाऊ राहू दे राहीन मह्या सुन्यासोबत उलट्या कडीच्या घरात .प्रकाश होळकरांच्या कवितेच्या ओळी साधर्म्य साधणाऱ्या वाटतात."जगणं सोपं असतं तर कन्हत कन्हत जगली नसती माणसं उगवण खरं असतं तर गाभाऱ्यात सुकली नसती कणसं वाट आपली असती तर शोधली नसती वहिवाट आघात खोटे असते तर घातला नसता जगण्याचा घाट .जगण्याच्या मुळाशी असणारी आदिम भुख या कवितेच्या केंद्रस्थानी आहे . म्हणून सुनीलची कविता काळाच्या कसोटीवर तावून सुलाखुन निघालेली श्रमिकांच्या वेदनचं गीत आळवणारी नी वाचकांच्या अंर्तमनाचा ठाव घेणारी कवीता आहे .आयुष्याचा सोनं होण्याआधी वितळून जावा माझ्यातला मी आणि शिल्लक राहवं करुणेनं लदबदलेलं जगणं अशा ओळी वाचल्या की कवीच्या भाषिक ताकदीची जाणीव होते . भोवतालाचा सांस्कृतीक वातावरण इथकं प्रदुषीत आणि भयकंपीत करणाऱ्या काळात कवीची कवीता ही मानवतावादी मुल्याची जोपसणा करीत . कामगाराच्या घामाला बावनकशी सोनं मुल्य प्राप्त करून देणारी कविता आहे . कवी एका कवितेत असं म्हणतो सुर्य उगवता कितीतरी आंधार असतो माझ्या डोळ्यांसमोर संकट सापासारखी शिरू लागली .माझ्या घरातआणि रक्ताच्या माणसासह घरादारांनेही घेतलाय आबोला कायमचा मला समजून सांगता आले नाही . आग पोटात ठेवण्याची गोष्ट किती भयंकर जगण्यातलं दु:ख आहे . घर फिरले की घरातले वासेही फिरतात . तसं सामान्य माणसाला आजचा दिवस मावळला की उद्याच्या दिवशी पोटाची गार कशी भरावी यात रात्र झोपू देत नाही . दिवस जगू देत नाही आशा विपरित परिस्थितीत कवी मी तोडून टाकलं सुख दु:ख नावाच्या जुळ्या भावांशी नातं . आणि माझ्या कामाचं कौतुक करायला माझ्या आईचा प्रेमळ स्पर्श आणि कौतुकाची थाप कधी मिळालीच नाही . तरीपण कवी आपल्या वाटयाला आलेलं नात्यांचं रितेपण पर्वताएवढं दु:ख कुरुवाळत न बसता. दु:खाला पाठ लावून सुखाची वाट शोधण्यात यशस्वी झाला. भाकरी सोबतचा लपाछपीचा खेळ खेळता कवीच्या हातून भाकर पाऱ्यासारखी निसटून जात राहिली . दारिद्रयाशी दोन हात करताना ऐन फुलऱ्यात पावसानं तडन दिल्यानं पोटरीत कणसं सुकुन जावीत तशी कवीचं बालपण होरपळून निघालं. तेव्हापासून कवीचा विश्वासच उडून गेलाथ शून्यातून जग निर्माण करणाऱ्या माणसावरचा आणि गुलाबी दिवसाचं स्वप्नही कवीला कधी पडलं नाही .उन्हात रक्त जाळतानां आणि विटबट्टीवर कोवळे हात वाळूत लाह्या भाजाव्यात तसे भाजत गेले. हे माझं कपाळावरचं करंटेपण पुसण्यासाठी कविते तु मात्र माझ्यासोबत होतीस . आतल्या आत रडलो खूपदा तरी मात्र चेहऱ्यावर सदा हास्यमुद्रा उमटीत राहिलो आपराध्यासारखं घाण्याला लावलेल्या बैलासारख दिवसभर कष्ट उपसणारा कामगार वर्ग मात्र रात्रीला माणूस होणं शक्य नसतं प्रत्येकाला पण .. गिधाडासारखे टपून बसलेले भांडवलदार कामगाराचं शोषण करीत राजरोसपणे सत्तेचा उपभोग घेतात: त्यांचा बेगडी बुरखा टराटरा फाडून शब्दबंबाळ करीत कामगारा हजारपटीने श्रीमत असल्याचा दावा करतो . कवी शेवटी म्हणतो एक नशा गरजेचीच असते पाठ जमिनीला ठेकताच झोप आंगावर ओढून घेण्यासाठी मग कवी कवितेचाच दंश करून घेऊन शब्दबंबाळ होतो कवितेच्याच नशेनं तो समस्त कामगाराचं दु:ख मांडत असतो . कवीला जगण्यासाठी संघर्ष करावा लागला त्यामुळे त्याला शाळा शिकता आली नाही .त्याच्या कुटूंबाकडे आयुष्यभर शाळेनं पाठ फिरवली . त्यांच्या जगण्यातला जिवंत अनुभवच देत राहिला .चिरंतन तत्वज्ञान आणि मांडत राहिला तो कागदावर रेघोट्या त्या कविता होऊन गात समष्टीच्या मुळ दु:खाची करून कहाणी कधी अजिठ्यांच्या लेणीतून तर कधी बुद्धाच्या करुणेतून तरलेला हा कवी असंख्य लढय्या लढत राहिला . पण शरण आला नाही परिस्थिसमोर ' सु:ख पहाता ज्वापाडे दु:ख पर्वता ऐवढे " संत तुकारामाच्या अभंगाचा प्रत्यय कवीच्या जीवनात सातत्याने आलेला आहे .

कवीच आयुष्य म्हणजे उंदरान कुरतडून टाकलेल्या चिंधकासारखं टाके भरावेत तरी कुठं विषम व्यवस्थेवर बोट ठेवतानां कवी म्हणतो त्यांच्या कुत्र्यात आणि माझ्यात फरक केला नाही कुत्रे लाजले पण . मी लाजलो नाही कुत्र्याच्या प्रामाणिक पणाला सलाम करून पुढे कवी निघून जातो .कवी बिकटवाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडू नको कष्टाची बरी भाजी भाकरी तुप सारखेची चोरी नको . आल्या आतिथा मुठभर द्याया मागे पुढती पाहू नको . एकूणच पहात सुनिल उबाळे यांच्या कविता ही मराठी साहित्य विश्वात वाचक रसिक निश्चित स्वागत करतील . एक आक्षरवाङ्मय ठरावी इतक्या ताकतीची आणि वास्तव अनुभुती देणारी आहे . कवितेच्या वारेमाफ आलेल्या पिकांत टाळसार दाणे बाजूला काढावेत . तशी ही कवीता लोकल ते ग्लोबल व्हावी . ही सार्थ आपेक्षा एक वाचक म्हणून मी करतो . या संग्रहात 83 कविता आहेत . त्यातील मोजक्याच कवितेचा रसस्वाद मी घेतलेलेला आहे . सर्वांनी विकत घेऊन वाचावा व आपल्या संग्रही कवितासंग्रह असावा इतका दर्जेदार आणि उत्तम बांधणी आर्कषक मुखपृष्ठ असलेला संगृह आहे .सुनीला दादा उबाळे यांच्या पुढील लेखन प्रवासाला खूप खूप शुभेच्छा देतो .

**प्रा. शिवाजी जोगदंड**
**नांदेड**
**मो.** 9545661923

**उल्ट्या कडीचं घर- कवी सुनील उबाळे**

**मुखपृष्ठ - सरदार जाधव**
**प्रकाशक - कैलास पब्लिकेशन्स**
**छ. संभाजीनगर मो.** 9325214191
**किमंत:**150

## महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित राज्य बालनाट्य स्पर्धेकरिता बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखा पुढाकार घेणार



दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या तर्फे राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेचे आयोजन केलं जाते. या स्पर्धा महाराष्ट्रातील विविध केंद्रावर होतात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या नाट्यचळवळीचा इतिहास पाहता या ठिकाणी सहभागी होणाऱ्या शाळांची आणि संस्थांची संख्या खूपच कमी असते. अनेक शाळांना या उपक्रमाची माहिती नाही तर काही शाळांना उपक्रमाची माहीत असून सुद्धा ते शासनाच्या या उपक्रमात सहभागी होत नाही. शाळांचा व हौशी संस्थांचा प्रतिसाद मिळावा आणि लहान मुलांना त्यांच्यातील अभिनय कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या रंगमंचवर त्यांना अभिनय करण्याची संधी मिळावी. याकरिता छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष नाट्य लेखक दिग्दर्शक आसेफ शेख (अन्सारी) यांनी बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर शाखा पुढाकार घेण्याचे कळवले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित राज्य बालनाट्य स्पर्धेत महानगरपालिका च्या शाळांनी सहभाग घ्यावा करिता बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर शाखा पुढाकार घेऊन शिक्षकांसाठी व मुलांसाठी कार्यशाळेचे आयोजन करणार तसेच त्यांना नाट्य निर्मिती प्रक्रियेसाठी आणि सरावासाठी मार्गदर्शन करणार याविषयीचे पत्र मनपा चे मा. शिक्षणाधिकारी श्री भरत तिनगोटे यांना छत्रपती संभाजीनगर शाखा चे अध्यक्ष आसेफ शेख (अन्सारी) यांनी पत्र दिले आणि याविषयी चर्चा केली.बालरंगभूमी परिषदतर्फे अनेक मुख्याध्यापकांना, शिक्षकांना, संस्थाना शासनाच्या या उपक्रमात जास्तीत जास्त महानगरपालिकेच्या , जिल्हा परिषदेच्या, खाजगी शाळांनी तसेच हौशी संस्थांनी या शासनाच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे या उद्देशाने लकरच शाळांसाठी, संस्थांसाठी मार्गदर्शन शिबिर घेण्यात येणार आहे. या शिबिरात सहभागी होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांनी, शिक्षकांनी, विविध संस्था अध्यक्ष यांनी बालरंगभूमी परिषदेचे छत्रपती संभाजीनगर शाखेचे प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड ८०५५३३२०९९, कोषाध्यक्ष विनोद आघाव ९३७०७२९४६०, सहकार्यवाह अर्चना देवधर ९४२२२८५५९०, सहकार्यवाह संतोष कुलकर्णी ९९२३२४४३३० यांच्याशी संपर्क साधावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ ऑगस्ट २०२५


## शासकीय विज्ञान संस्थेत 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण



**छत्रपती संभाजीनगर :** येथील शासकीय विज्ञान संस्थेच्या परिसरात राष्ट्रीय सेवा योजना विभाग शासकीय विज्ञान संस्था, शासकीय न्याय सहाय्यक विज्ञान संस्था आणि शिवराज भैय्या मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने 'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय विज्ञान संस्था आणि शासकीय न्याय सहाय्यक विज्ञान संस्थेचे संचालक प्रा. डॉ. राजेंद्र सातपूते हे होते. तर पाचोडचे युवा सरपंच शिवराज भुमरे दै. महाराष्ट्र जनशक्ती आणि एम. जे. न्यूजचे मुख्य संपादक प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विनोद पाटील यांनी केले. यावेळी शिवराज भूमरे आणि प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांनी विद्यार्थ्यांना समयोचीत मार्गदर्शन केले. तर डॉ. राजेंद्र सातपूते, शिवराज भूमरे, प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांच्या हस्ते संस्थेच्या परिसरात विविध प्रजातींची झाडे लावण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिषेक गावडे यांनी केले तर डॉ. राहुल गावडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. शरदकुमार नवरडे, प्रा. डॉ. सांगळे, प्रा. डॉ. पेटकर, शिवराज भैय्या मित्र मंडळाचे अध्यक्ष शुभम कांबळे, प्रशांत भिंगारे, अनिकेत मापारी यांनी परिश्रम घेतले.

## मनोज जरांगे मुंबईत आलेच तर जेलमध्ये जावे लागणार : ॲड. सदावर्ते



**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला मुंबई उच्च न्यायालयाने परवानगी नाकारली आहे. न्यायालयाचा हा निर्णय येताच वकील गुणरत्न सदावर्ते यांनी प्रतिक्रिया देत जरांगेंवर टीका केली आहे. तसेच ते मुंबईत आले तर जेलमध्ये जावे लागणार, असा दावा देखील सदावर्ते यांनी केला आहे.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, जरांगे पाटील यांनी आंदोलनाची परवानगी घेतली नसल्याचे सिद्ध झाले आहे, मी कालच सांगितले होते, जरांगे पाटील मुंबईत येणार नाहीत, मुंबईमध्ये कायदा चालतो, जरांगे पाटील नाही. खारघर आणि नवी मुंबईमध्ये तरी जरांगे पाटील यांना परवानगी आहे का? जर आता जरांगे पाटील यांनी काही केले तर थेट त्यांना जेलमध्ये जावे लागेल, असा दावा सदावर्ते यांनी केला आहे.

जरांगेंचे आंदोलन दिसत असले तरी त्याचा आत्मा राजकीय आहे. जरांगे कुणाच्या तरी हातातील बाहुले आहे. यापुढे त्याचे कोणतेहा बेकायदा कृत्य चालणार नाही, असा इशारा सदावर्तेंनी दिला. किती माजलाय तो जरांग्या, त्याची भाषा मग्रूरीची आहे. जरांगेला अटक होणे आणि त्याला कायदा कळणे यानंतरच त्याला समजेल असे गुणरत्न सदावर्ते म्हणाले.

पुढे बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले, मुद्दा असा आहे, न्यायालयापेक्षा कोणीही मोठे नाही. जरांगेही कायद्यापेक्षा आणि संविधानापेक्षा मोठा नाही. उच्च न्यायालयात दोन याचिका आहेत, एक जनहित याचिका आणि दुसरी माझी याचिका. मुंबई उच्च न्यायालयाने यापैकी एका प्रकरणाच्या सुनावणीत आझाद मैदानावर पूर्वपरवानगीशिवाय आंदोलन करता येणार नाही, असे निर्देश दिले आहेत.

पुढे बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले, जे कोणी जरांगेंचे गॉडफादर, मसिहा किंवा मास्टरमाईंड असतील त्यांनी आता जरांगे यांना सांगावे की, आता नो एन्ट्री इन आझाद मैदान. डंके की चोटपर असा हा आदेश आहे. तो प्रत्येकाला लागू आहे. त्यामुळे आता मनोज जरांगेला आझाद मैदानावर आंदोलन करता येणार नाही. मनोज जरांगे हा काय एवढा मोठा नाही, तो नियम आणि कायद्यापेक्षा मोठा नाही. जरांगेला कोर्टाचा आदेश ऐकावा लागेल. सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे ओएसडी जरांगेला भेटायला जाणे हा लोकशाही प्रक्रियेचा भाग आहे.

मनोज जरांगे ज्याप्रकारे बेकायदा आणि परवानगी नसताना बोलत आहेत, लोकांची आई-बहीण काढत आहेत, या सगळ्या गोष्टी आम्ही आमच्या याचिकेत टाकल्या आहेत. हे गंभीर गैरवर्तन आहे. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्यास सहा महिने शिक्षा होऊ शकते. आझाद मैदानात दोन आठवडे काही करायचे नाही, न्यायालयाचा निकाल हा सर्वंकष असतो. तो सगळ्यांना बंधनकारक असतो. हे मनोज जरांगेंनी आपल्या डोक्यात घालून घ्यावे, असेही सदावर्ते म्हणाले.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103